महिला सबलीकरणाकरीता महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभागांर्तगत राबविलेल्या

शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन,

विशेष संदर्भ :- नांदेड जिल्हा

कालावधी २०१० ते २०१९

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड.

स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

वाणिज्य विभागात पीएच. डी. पदवीसाठी सादर केलेला शोध-प्रबंध

संशोधिका

कु. सरिता बाबुराव कदम

(पीएच.डी. प्रशिक्षणार्थी)

मार्गदर्शक

प्रा. डॉ. वसंत आनंदराव पवळे

(एमकॉम, पीएच.डी. एल. एल. एम)

संशोधिकेचे प्रतिज्ञापत्र

मी प्रतिज्ञापुर्वक निवेदन करते की, सबलीकरणाकरिता महिला व बालविकास विभागांर्तगत राबविलेल्या शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन विशेष संदर्भ :- नांदेड जिल्हा कालावधी 2010 ते 2019 हा शोध-प्रबंध मी स्वत: डॉ.प्रा. वंसत आनंदराव पवळे यांच्या मार्गदर्शनाखाली पुर्ण करत आहे. हा शोध-प्रबंध मी यापुर्वी कोणत्याही विद्यापिठाला परिक्षेसाठी सादर केलेला नाही.

प्रस्तुत शोध-प्रबंध वाणिज्य शाखेतील तत्वज्ञान पारंगत सत्र 2022-23 या परिक्षेकरिता प्रथमच स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठासाठी सादर करत आहे.

स्थळ :- नांदेड

दिनांक :-

कु. सरिता बाबुराव कदम

(पीएच.डी. प्रशिक्षणार्थी)

महिला सवलीकरणाकरीता महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभागांर्तगत राबविलेल्या शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन विशेष सदंर्भ :- नांदेड जिल्हा

कालावधी २०१० ते २०१९

प्रस्तावना :

दैनंदिन जीवनात अगदी सहजतेने विविध भूमिका पार पाडत महिला समाजाच्या आधारस्तंभ बनले आहेत. कधी प्रेमळ कन्या तर कधी वात्सल्यपूर्ण माता तर कधी सक्षम सहचारिणी अशी विविध नाती अगदी कुशलतेने आणि कोमलतेने त्या निभावत आहेत. असे असले तर जगाच्या पाटीवर बऱ्याच ठिकाणी त्यांच्याकडे दुर्लक्ष होताना दिसते. तसेच महिला मोठया प्रमाणात सामाजिक असमानता अत्याचार आर्थिक परावलंबित्व आणि अन्य सामाजिक अत्याचारांना बळी पडतात. अनादी काळापासून महिलांवरील हि बंधने त्यांच्या वैयक्तिक व व्यावसायिक विकासाला आड येत आहेत.

भारतीय संस्कृती "**यत्र नार्यस्तु पूज्यन्ते रमन्ते तत्र देवतः**" असेच सुभाषिक आहे याचा अर्थ ज्या समाजात स्त्रियांची पूजा होते तेथे देवता नांदतात किंवा रममाण होतात तथापि आज समाजात डोळसपणे पाहिले तर प्रत्यक्ष वस्तुस्थिती वरील सुभाषितांच्या जवळजवळ विरुद्ध आहे ही बाब खरी क्लेशकारक आहे.

आज २१ व्या शतकातही स्त्री आर्थिक, सामाजिक, मानसिक, शारीरिक गुलामगिरीच्या विळख्यातून बाहेर निघत असले तरी सुसंस्कृत समाजात मुख्य आधार स्तंभ असलेली स्त्री अजुनही अवलंबुन आहे. संसाररुपी रथाचे स्त्री आणि पुरुष हि दोन चाके आहेत, त्यामुळे पुरुषासोबत महिलांचा विकास होणे काळाची गरज आहे.

महिलांच्या सामाजिक व आर्थिक स्थितीमध्ये आमूलाग्र बदल घडुन आणण्यासाठी राष्ट्रीय-आंतरराष्ट्रीय संस्थाद्वारे विशेष प्रयत्न केले जात आहेत. इ.स. १९७० साली पाहता स्त्री अभ्यासाची सुरुवात झाली ती म्हणजे उच्च शिक्षणात हस्तक्षेप करुन होय. भारतातील स्त्रियांविषयी अध्ययन, अध्यापन, संशोधन विस्तार या वाटेने नवी जाणीव व विज्ञान निर्मिती करण्यासाठी इ.स. १९७० ते इ.स.

१९८० या काळात प्राधान्याने त्यांच्या विविध आणि विशिष्ट समस्या विषयी लेखन केले गेले आहेत. इ.स. १९९० च्या सुमारास स्त्री अभ्यास अध्यापन करण्याविषयी गांभीर्याने विचार सुरु झाला.

सबलीकरणासाठी भारतात स्त्री अभ्यासाला सुरुवात झाली स्त्रियांच्या समस्या वर स्वतंत्रपणे अभ्यास करुन त्यातील अडचणी समजून घेणे व उपाययोजना करता येतील का, या संदर्भात प्रयत्न केले गेले. इ.स. १९७५ हे वर्ष आंतरराष्ट्रीय महिला वर्ष म्हणून पाळले गेले व इ.स. १९७५ ते इ.स. १९८५ हे महिला दशक घोषित केले. इ.स. १९९५ मध्ये पेइचिंग ४ थ्या विश्व महिला संमेलनांमध्ये समता, विकास आणि शांतीवर महिलांच्या संदर्भात चर्चा करण्यात आली.

जागतिक पातळीवरुन त्यांच्या समस्या बाबत विचार विनिमय सुरु झाल्यामुळे त्यांच पडसाद भारतावरही उमटले याचाच परिणाम म्हणून स्थानिक स्वराज्य संस्थेत ३३ टक्के महिला आरक्षणाची घोषणा संसदेच्या ७३ व्या व ७४ व्या घटनादुरुस्तीने शासनाला करावी लागली तसेच शासनाने महिलांसाठी केंद्र व राज्य पातळीवर महिला धोरण जाहीर केले. इ.स. २००१ वर्ष महिला सबलीकरण वर्ष म्हणून जाहीर करुन महिलाबाबत वेगळया योजना आखल्या. जेणे करुन महिलांच्या जीवनमान दर्जा उंचावणे, त्यांच्या प्रगतीतील सामाजिक, राजकीय व आर्थिक अडथळे दूर करणे हा उद्देश होता.

महिलांना समाजात सन्मान प्राप्त करुन देण्यासाठी विविध स्तरावरील महिलांना आत्मसन्मान अंतर्गत मजबुती आणि रचनात्मक विकासात कारणीभूत होतील असे महिला सबलीकरण कार्यक्रम व योजना सुरु केले आहेत या कार्यक्रमामुळे व योजनांमुळे महिला आता सर्व समस्यावर मात करत आपले कौशल्य आणि आत्मविश्वासाबाबत अग्रेसर होताना दिसतात आपल्या कुटुंबामध्ये इतर महिलांसाठी व समाजामध्ये शांतीचे व सकारात्मक सामाजिक परिवर्तनाचे प्रतिनिधित्व करताना दिसतात.

<u>महिला सबलीकरणाच्या व्याख्या :</u>

महिला सबलीकरण ही संकल्पना पूर्णपणे नवीन नाही सर्व समाजामध्ये विविध क्षेत्राबाबत त्याचा इतिहास उपलब्ध आहे. नवीन आहे ती त्याचा पुनरावर्ती स्त्री कल्याण, स्त्री विकास याद्वारे

आता ती स्त्री सबलीकरणा पर्यंत आला आहे. याचाच अर्थ १० ते १५ वर्षापासून महिलांच्या संदर्भात सबलीकरण या शब्दाचा मोठया प्रमाणात वापर केला आहे.

महिला सबलीकरण म्हणजे महिलांना स्वावलंबी बनविणे असा साधारणता: अर्थ काढता येईल सामाजिक दृष्टीकोनातून स्त्रियांवर अन्याय सुरु आहे. या अन्यायाची भरपाई करणे म्हणजे स्त्रियांचे सबलीकरण होय. थोडक्यात स्त्रीला सामाजिक, आर्थिक, राजकीय व प्रशासकीय क्षेत्रात योग्य प्रमाणात सहभागी करुन निर्णय प्रक्रियेत सहभागी करणे म्हणजेच स्त्री सक्षमीकरण किंवा सबलीकरण होय.

Encarta Dictionary :-

1) Empower means given authority and somebody to give somebody a power or authority inspire somebody with confidence to give somebody a sense of confidence or self-esteem.
2) Empowerment may mean equal status to women opportunity and freedom to develop herself.

महिला सबलीकरणाचा सामान्य व्याख्याच स्वरूप वरील प्रमाणे स्पष्ट करण्यात आले आहे.

तज्ञांच्या व्याख्या अभ्यासावरुन शोधप्रबंध प्रवचनात स्पष्ट करेन.

<u>**उपलब्ध साहित्यांचा आढावा :- (Review Of Literature)**</u>

- **तलपे निर्मला मुरलीधर**

  महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाच्या निवडक योजनांचा चिकित्सा अभ्यास (पूणे जिल्ह्यापुरता मर्यादित) कालावधी २०००-२००१ ते २००९-२०१०.

यांनी विविध योजना मधील लाभार्थी महिलांच्या नमुना पाहणीवरून त्यांच्या जिवनात झालेल्या सर्व प्रकारच्या बदलांचा आढावा घेतला आहे. तसेच विविध प्रकारच्या योजनांद्वारे महिल्यांच्या विकासासाठी प्रयत्न केले जातात व त्यांच्या समस्येचे अध्ययन या ठिकाणी करण्यात आले. प्रस्तुत शोध प्रबंधनातून अभ्यास हेतुच्या आधारे त्यांचा व्याख्या, स्वरुप, उद्दिष्टे, तत्वे यांची मदत मिळाली व याबाबत संशोधनाची अहवाल लेखन कसे करावे याबाबत संबंधित शोध प्रबंधाचा संशोधिका अभ्यास करणार आहे.

- **काटोले प्रशांत, (२००७),**

  स्त्रीयांच्या आर्थिक विकासात विविध योजनांचे योगदान अमरावती जिल्हयाच्या संदर्भात विशेष अध्ययन.

  प्रस्तुत संशोधनात अमरावती जिल्हयातील महिलांच्या विकासाचा शासकीय व निमशासकीय योजना अभ्यासने, अमरावती जिल्हयातील विविध योजनांमध्ये महिलांचा सहभाग अभ्यासने, विविध योजनांमुळे लाभार्थी महिलांच्या रोजगार वाढीत कसा बदल झाला, याचा आढावा घेणे अशा विविध पैलूंचा अभ्यास करण्यात आला आहे.

- **मोटे डी.यु.**

  ७४ वी घटना दुरुस्ती आणि महिला नेतृत्व एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ बीड जिल्हा

प्रस्तुत शोध प्रबंधनातुन ७४ वी घटना दुरुस्ती आणि महिला नेतृत्वाची शैली यांचा अभ्यास करण्यात येणार आहे. यांनी आपल्या अभ्यासात, ऐतिहासीक व वर्णनात्मक अशा संशोधनाचा उल्लेख केला आहे तसेच यांनी आपल्या अभ्यासात उद्योजक, महिला सरकारी अधिकारी, स्वायत्त व ऐच्छिक संस्थेतील महिला यांच्या रचनात्मक कार्यपध्दतीचा आधार घेतला आहे. यांचा अभ्यासाचा मुख्य उद्देश महिला उद्दोजकांना प्रोत्साहन देणे, भांडवल, अनुदान, तज्ञांचे सल्ले इ. अशा गोष्टींचे मार्गदर्शन करणे तसेच या शोध प्रबंधनातुन महिलांमध्ये उच्च शिक्षणाचे प्रमाण अधिक आहे. परंतु कौटुंबिक व व्यावसायीक जबाबदा-या, तानतनाव अशा विविध कारणांमुळे त्या शिक्षणाकडे दुर्लक्ष करुन काम करण्यास तयार होत नाही. असे अभ्यासकाने नमुद केले आहे.

- **डॉ. गायकवाड एस.पी.**

  महिला नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ लातुर जिल्हा.

  प्रस्तुत शोध प्रबंधनात महिला सबलीकरणाची माहिती, पार्श्वभूमी यांचा अभ्यास करणार आहे. महिलांमध्ये राजकीय, कायदेशीर, सामाजिक व आर्थिक बदल कसा घडवून आणता येईल याबाबत

विवेचन करण्यात आले. ज्याचा संशोधिकेला बऱ्याच प्रमाणात मार्गदर्शक लाभले व लघुशोध प्रबंधनास दिशा मिळाली.

- **आमले समाधान साहेबराव**

  मराठवाडयातील स्वयंसहाय्य गट आणि महिला सबलीकरण औरंगाबाद आणि जालना जिल्हयाचा विशेष अभ्यास.

  प्रस्तुत शोध प्रबंधनातुन संशोधिकने स्वयंसहाय्य गट या बद्दलची माहिती तसेच विविध बँकांनी दिलेले कर्जवाटप यांचा अभ्यास करणार आहे. यांनी मराठवाडयातील महिलांच्या शाश्वत विकासाचा अभ्यास करण्यासाठी पाहणी केली. अभ्यासात त्यांना असे आढळुन आले की, महिला बचत गटातील सामुहिक कार्यामुळे त्यांच्या आत्मविश्वासात वाढ झाली.

- **जाधव ज्ञानेश्वर हरिदास**

  महिला नेतृत्व, सबलीकरण व परिवर्तन एक समाजशास्त्रीय अभ्यास विशेष संदर्भ- लातूर जिल्हा संशोधन प्रबंध सप्टेंबर २०१४.

  प्रस्तुत शोध प्रबंधनात महिलांच्या सामाजिक सुरक्षेतील वाढीचा अभ्यास केला. अभ्यासात त्यांना असे आढळुन आले की, महिला सबलीकरण हि बहु आयामी प्रक्रिया आहे की, ज्यामध्ये सामुहिक शक्ती मिळवण्यासाठी अंतर्भुत असलेले संसाधने स्थापन करणे, क्षमता वाढवणे, त्यांच्यातील दारीद्रय कमी करणे हा हेतु आहे. अभ्यासकाच्या मते, महिलांच्या मागण्यांची पूर्तता होऊ लागल्यामुळे महिलांच्या सबलीकरणात वाढ होण्यास मदत झाली.

- **सौमित्र चक्रवर्ती**

  भारतातील महिला सक्षमीकरण समस्या, आव्हाने आणि भविष्यातील दिशा.

प्रस्तुत संदर्भ ग्रंथातून भारतीय स्त्रीयांच्या पारंपारीक मुल्यांविषयीच्या विचारांचे अन्वेषन करणे या मुल्यांमध्ये काही बदल होतो आहे काय ? याचा शोध घेणे तसेच महिला सबलीकरणाकरीता भविष्याच्या दृष्टिने येणाऱ्या समस्या, आव्हाने तसेच संशोधनासाठी लागणारी माहिती प्राप्त झाली आहे.

- **श्री. प्रदिप आगलावे**

संशोधन पध्दतीशास्त्र व तंत्रे, विद्या प्रकाशन, नागपूर

या पुस्तकातून संशोधन हे नविन ज्ञान प्राप्तीसाठी शास्त्रीय पध्दतीचा अवलंब करुन करण्यात येते. या पुस्तकातून वर्णनात्मक मुलाखतीचे संशोधन पध्दतीचा अर्थ व व्याख्या संकलनाची साधने, सर्वेक्षण पध्दतीचा प्रकार इ.तथ् माहिती अभ्यासणार आहे. आणि नविन ज्ञान प्राप्तीसाठी प्रयत्न करणार आहे. परिणामतः संशोधनाला एक दिशा देण्यासाठी ह्या पुस्तकाची मदत मिळणार आहे.

- **डॉ. विलास आढाव**

महिला सबलीकरण प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग, पुणे विद्यापीठ. प्र.आ. २००९ वि. आ. २०१०

या संदर्भ ग्रंथातून अभ्यासकाला महिलांचे आर्थिक व सामाजीक सबलीकरण झाले पाहिजे देशातील आर्थिक पायाभुत सुविधांची उपलब्धता आणि आवश्यकता यांच्यातील व्यापक अंतर लक्षात घेऊन महिलांचे सबलीकरण होणे गरजेचे आहे. त्यामुळे क्षेत्रीय स्तरावर योजनांची अमलबजावणी होणे आवश्यक आहे. संशोधिकेला शीर्षकातील विविध प्रकारच्या सज्ञांची माहिती मिळवण्यासाठी संबंधित संदर्भाचा उपयोग करणार आहे.

- **चौगुले सुमती**

महिला सबलीकरणाची नवी दिशा इंदुजा प्रकाशन २००५

या पुस्तकाचा संशोधिकेला महिलांना सक्षम करण्याकरीता योजनांची माहिती, कार्यक्रम व शिबिरे यांची माहिती मिळवण्यासाठी मदत मिळाली, तसेच शोध प्रबंधनाला दिशा मिळविण्याचा मार्ग मिळाला. महिला सबलीकरणाची सुत्रे व महिला शक्ती जागृतीची गरज हि काव्यात्मक स्वरुपात अतिशय सुंदर रितीने मांडण्यात आली आहे.

- **डॉ. भगवान सहाय्य**

  मंत्रालय विभागांमधील महत्वाच्या विविध शासकीय योजनांची माहिती पुस्तिका सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दि. १४ सप्टेंबर २०१५.

या पुस्तकेतून संशोधिकेला महाराष्ट्र शासनाच्या विविध योजनांची माहिती, शासन निर्णय धोरणे, अधिनियम सदस्यमंडळ आणि कालावधी यासंबंधीची सविस्तर माहिती दिली आहे.

- **डॉ. संदीप कुमार चौधरी**

  शिक्षण आणि समाज योजना एप्रिल २००६

  महिला सशक्तिकरण शिक्षणाची भूमिका

  शिक्षण आणि समाज योजना एप्रिल २००४

  या संदर्भ पुस्तकातून महिलांचे सामाजिक सबलीकरण, महिला संबंधीच्या विषयांचा अभ्यास केला आहे. या अंतर्गत शिक्षण, समान संधी. स्त्रीयांच्या विविध कारणासाठी होणारी हिंसा व अवहेलना हि स्त्रीयावरील पुरुषसत्ता नियंत्रणाचे संख्यात्मक साधन असून त्याला वेगवेगळ्या पैलुनुसार मांडण्यात आले. संशोधनासाठी लागणारी सामग्री गोळा करण्यासाठी मोठया प्रमाणात वापर केला आहे.

- **वसुंधरा स्मरणिका**

  भारतातील महिलांची आर्थिक स्थिती

  के. आर. एम. कला व वाणिज्य महाविद्यालय, नांदेड

  दि. १३ मार्च २०१०

  या अंकातून भारतातील महिलांच्या अर्थिक स्थितीचा आढावा अनेक अभ्यासकाने मांडला आहे. प्रत्येकाने महिलांच्या सामाजिक, राजकीय आणि कौटुंबीक पैलुना मांडण्याचा प्रयत्न केला आहे. अभ्यासकाच्या दृष्टिने, भारतासारख्या विकसनशिल देशातील महिलांची आर्थिक परिस्थिती पाहिजे तेवढ्या प्रमाणात सुधारलेली नाही. ह्या करीता महाराष्ट्र सरकारला विविध योजनांची अमलबजावणी करुन त्यांना पायाभूत सुविधा देऊन सक्षम करणे गरजेचे आहे. अर्थातच, त्यांच्यात

योग्य त्या सुधारणा करणे आवश्यक असल्याचे नमुद केले आहे. संशोधिकेला आवश्यक अशा कार्यपध्दती, तंत्र व संबंधित संदर्भ ग्रंथाची माहिती देखील अभ्यासली.

- **अभ्यासकुमार नयक, प्रविणकुमार पाणिगृही**

  स्वयं मदत गटामध्ये सहभाग आणि महिलांचे सक्षमीकरण एक अभ्यास.

  या जर्नल्स मधून महिला स्वतःहून पुढाकारातून नवनवीन उद्योगांची निर्मिती करत आहे याचा एक आढावा प्राप्त झाला आहे. तसेच यांनी आपल्या अभ्यासात महिला सक्षमीकरणाची व्याख्या, भारतातील स्त्रीयांची एक नवी ओळख करुन व बचत गटाचा सखोल अभ्यास करुन स्त्री सक्षमीकरणामध्ये महिला स्वयंसहाय्यता बचत गटाची काय भुमीका आहे. याचे सविस्तर विवेचन, निष्कर्ष व योग्य त्या शिफारशी देऊन केल्या आहेत.

- **डॉ. तनु टंडन**

  महिला सक्षमीकरण दृष्टीकोण आणि दृश्य.

प्रस्तुत जर्नल्स मधील महिला सक्षमीकरणाच्या दृष्टीने महिलांचे जगाकडे बघण्याचा दृष्टिकोन आणि त्यातून निर्माण होणाऱ्या समस्या व त्यावर निराकरण कसे करत आहेत असे अभ्यासाच्या दृष्टीने संशोधिकेला निदर्शनास दिसून आले. महिलांच्या आर्थिक विकासासाठी, शिक्षण, आरोग्य इत्यादी गोष्टींचा विकास करणे गरजेचे आहे. महिलांचे सबलीकरण आणि आर्थिक विकासामध्ये वाढ दिसते.

- **प्रा. सौ. संगीता स. स्वामी**

  स्त्री सबलीकरणात विविध योजनांचे योगदान एक ऐतिहासिक आढावा

या जर्नल्समधून संशोधिकेला महाराष्ट्र राज्य सरकाच्या महिला सबलीकरणाकरीता राबविलेल्या शासकीय योजनांमुळे महिलांच्या सामाजीक, राजकीय व आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा झाली आहे. महिलांनी त्यांचे लघु व्यवसाय सुरु केले आहे तसेच त्यांच्या मान सन्मानात वाढ झाली आहे. अभ्यासात असेही दिसुन आले आहे की, यामध्ये शासनाच्या योजनांचे मोठे योगदान आहे.

- **योजना अंक, जून २०१२ महिला सवलीकरण**

  सप्टेंबर २०१६ महिला सबलीकरण

  प्रस्तुत योजना अंकातून महिलांचे आर्थिक व सामाजिक सबलीकरण दिसून येते. महिलांना सामाजिक व आर्थिक बळ प्राप्त होते. तसेच महिला समाजकारण, राजकारण, अर्थकारण, सांस्कृतिक कार्यात सक्रिय सहभागी होत आहेत असे संशोधिकेला अध्ययनातून निदर्शनास आले.

<u>संशोधन पध्दती आणि विषय निवड :-</u>

प्रस्तावना :-

महिला व बालविकास विभागांतर्गत महिला विकासाच्या विविध योजना राबविण्यात येत असून देशाचा विकास होण्यासाठी समाजातील सर्व घटकांचा प्रत्यक्ष सहभाग असणे आवश्यक आहे. समाज व शासन हे एकाच विकास रथाची दोन चाके असून ती समाज गतीने व समतोल साधत मार्गक्रमण करतील तर सामाजिक विकासाचा पल्ला सहज गाठता येईल आणि त्यातुन समाज व शासन या दोघांचाही उत्कर्ष साधला जाईल याची जाणीव शासन व समाजाला होण्यासाठी या विषयाची संशोधीकने निवड केली आहे.

संशोधन अभ्यासात महाराष्ट्र शासनाने महिला व बालविकास विभाग व जिल्हा परिषद यांच्या मार्फत महिला सबलीकरणासाठी राबविलेल्या एकुण योजनापैकी महत्वपूर्ण अशा मोजक्याच योजनांचा अभ्यास करणार आहे.

<u>संशोधन विषय निवडीचे कारण :- (Selection of Research Topic)</u>

1. महिला सबलीकरण याकरिता महाराष्ट्र शासनाने काणकोणत्या योजना पार पाडल्या आहेत हे पाहणे याकरीता संशोधिकेने हा विषय अध्ययना करिता निवडला आहे.
2. महिलांसाठी राबवित असलेल्या योजना विविध योजना अंतर्गत स्वयंरोजगाराच्या संधी उपलब्ध होत आहेत किंवा नाही हे तपासून पाहणे.
3. महिला सबलीकरणाचा विकास कसा झाला किती महिला या योजनांचा लाभ घेतात हे पाहणे.
4. गरजू महिलांना ह्या शासकीय योजनांचा लाभ किती प्रमाणात होतो जाणुन घेणे.

संशोधनाची उद्दिष्टे / उद्देश :- (Objective the Research)

1. महिला सबलीकरणाची संकल्पना व गरज जाणून घेणे.
2. महिला सबलीकरणासाठी महिला व बाल विकास विभागांतर्गत शासकीय योजनाबाबत जागरुकतेचे मुल्यांकन करणे.
3. महिलांच्या आर्थिक सबलीकरणावर परिणाम करणाऱ्या घटकांचे विश्लेषण करणे.
4. महिला सबलीकरणासाठी महिला व बाल विकास विभागांतर्गत शासकीय योजनांचा अभ्यास करणे.
5. महिला सबलीकरणाकरीता राबवित असलेल्या योजनांच्या अंमलबजावणीतील उणीवा शोधून काढणे.
6. शासकीय योजना राबविणाऱ्या अधिकार्यांच्या अडचणी जाणून घेणे.
7. महिला सबलीकरणाच्या दृष्टीने शासनाच्या योजनांची उपयोगिता जाणून घेणे

संशोधनाची गृहितके :- (Hypothesis of Research)

1. महिला सबलीकरणासाठी महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभागांतर्गत राबविलेल्या शासकीय योजनांमुळे लाभार्थी महिलांचा आर्थिक आणि गुणात्मक विकास झाला.
2. आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील महिलांच्या सबलीकरणासाठी महिला व बाल विकास विभागांतर्गत येणाऱ्या योजना एक महात्वाचा मार्ग आहे.

संशोधनाची व्याप्ती :- (Scope of Research)

संशोधिकेने संशोधन करण्यासाठी नांदेड जिल्ह्याची निवड केली आहे. नांदेड जिल्ह्याच्या स्वरुपात असून त्यात एकुण १६ तालुके आहेत. "महिला सबलीकरणाकरीता महाराष्ट्र शासनाने महिला व बाल विकास विभागांतगत राबविलेल्या शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन" विशेष संदर्भ :- नांदेड जिल्हा कालावधी २०१० ते २०१९ करण्याचे ठरविले आहे. नांदेड जिल्ह्यातील महिला स्वतः सक्षम करण्याकरीता शासकीय योजनांचा लाभ घेतात का? यातुन त्याचा विकास होतो का? याचा सखोल व सविस्तर अभ्यास करण्यासाठी नांदेड जिल्हा हा विशेष संदर्भ घेतला आहे.

तथ्य संकलनाची पध्दती :-

महिला सबलीकरणाकरीता महाराष्ट्र शासनाने राबविलेल्या महिला व बालविकास विभागांतर्गत राबविलेल्या शासकीय योजनांचे आर्थिक अध्ययन अभ्यास करत असतांना संशोधिकने खालील प्रमाणे माहिती संकलन पध्दतीचा वापर केलेला आहे.

❖ **प्राथमिक माहिती संकलन :-**

प्राथमिक माहिती संकलनामध्ये मुलाखत तंत्रा सोबतच माहिती गोळा अनुसूची व प्रश्नावलीची मदत घेऊन करणार आहे. माहिती मिळविण्यासाठी गरजेनुसार लाभार्थ्यांची चर्चा केली जाणार आहेत तसेच निरीक्षण पध्दतीचा उपयोग केला जाणार आहे.

❖ **दुय्यम माहिती संकलन :-**

संशोधिकेला संशोधन करत असतांना दुय्यम माहिती पध्दतीसुध्दा महत्त्वाची असते. संशोधिकेने नांदेड जिल्ह्यातील महाराष्ट्र शासनांच्या महिला व बाल विकासांतर्गत योजनांचा व लाभार्थींचा अभ्यास करण्यासाठी दुय्यम पध्दती अंतर्गत संदर्भ ग्रंथ, पुस्तके, मासिके, विभागाचे अहवाल, शासनाचे परिपत्रक यांचा उपयोग करण्यात येईल तसेच उपलब्ध साहित्याचा विभागाच्या संकेत स्थळावरुन आणि इंटरनेटवरुन माहिती संकलीत करण्यात येईल.

नमुना निवड :- (Selection of Sampling)

संशोधन पध्दतीचा अविभाज्य अंग म्हणून नमुना निवड पध्दतीचा उल्लेख केला जातो. नमुना निवड म्हणजे संपूर्ण सामग्राचा जेव्हा अभ्यास करणे अशक्य असते त्यावेळी त्यातील काही प्रतिनिधीत्व करणारे एकक निवडुन त्याचा अभ्यास करणे होय. नमुना निवड करतांना अभ्यासाचे क्षेत्र व एकरुपता लक्षात घेतली पाहिजे. साधारणतः यामध्ये विविध योजनांचा समावेश आहे त्यापैकी संशोधीका फक्त निवडकच योजनांचा अभ्यास करणार आहे. गैर संभाव्यता नमुनाचाचणीचा माहिती संकलनासाठी समाविष्ट करण्यात येईल. संशोधनाचे कार्यक्षेत्र हे नांदेड जिल्हा आहे. नांदेड जिल्ह्यातील १६ तालुक्यातील लाभार्थ्यांची आणि विविध योजनांची आकडेवारी पहाता अभ्यासासाठी घेतलेल्या योजनेच्या लाभार्थ्यांची संख्या लक्षात घेऊन प्रत्येक तालुक्याला प्रतिनिधी स्वरुपात प्रत्येक

योजनेचे ५ लाभार्थी म्हणजेच १२ योजनांचे ६० लाभार्थी एका तालुक्यातुन निवड करण्यात येईल आणि संशोधनासाठी संशोधीकेने एकुण १६ X ६० असे ९६० नमुना यादृच्छीकपणे सर्वेक्षणासाठी निवड केलेली आहे. हा गुणात्मक दृष्टिकोन मुलाखतीच्या मदतीने पूर्ण होईल.

अध्ययन क्षेत्राची ओळख :-

संशोधनाचे क्षेत्र हे नांदेड जिल्हा आहे. त्यात एकुण १६ तालुके आहेत.

संशोधनाच्या मर्यादा :- (Limitation of Research)

1. संशोधनाचा कालावधी २०१० ते २०१९ या दहा वर्षांकरिता मर्यादित केलेला आहे.
2. संशोधनांतर्गत फक्त महिला सबलीकरणाच्या महिला व बालविकास विभागांतर्गत शासकीय योजनांचा समावेश करण्यात आलेला आहे.

निवडक शासकीय योजनांची नावे.

एकात्मिक बालविकास सेवा योजना, महिलांसाठी व्यावसायीक व तांत्रिक प्रशिक्षणाची योजना, महाराष्ट्र शासन महिला आयोगाच्या योजना, ग्रामीण भागातील आर्थिकदृष्टया कमकुवत असलेल्या महिलांसाठी विविध योजना (मोफत शिलाई मशिन व पिठाची गिरणी ई.). कामधेनू योजना, निराधारांसाठी शासनाचा आधार, बालीका समृध्दी योजना, इंदिरा गांधी संरक्षण योजना, देवदासी पुर्नवसन योजना, महिला बचत गट, व्यावसायीक प्रशिक्षण घेणाऱ्या मुलींना विद्या वेतन, मुलींना स्वसंरक्षणासाठी व त्यांच्या शारिरीक विकासासाठी प्रशिक्षण योजना.

३. संशोधनासाठी नांदेड जिल्हा कार्यक्षेत्र निवडण्यात आलेले आहे.

४. संशोधनासाठी नमुना निवड पध्दतीने ठराविक गांवामधील लाभार्थ्यांची निवड करण्यात येईल.

५. संशोधनाअंती निर्माण झालेली निष्कर्ष सर्व ठिकाणी लागू असतीलच असे नाही.

प्रकरणाची रुपरेषा :-

प्रस्तुत शोध प्रबंध हा एकुण पाच प्रकरणात विभागला जाणार आहे.

प्रकरण पहिले- प्रस्तावना

प्रकरण दुसरे -उपलब्ध साहित्याचा आढावा

प्रकरण तिसरे- संशोधन पध्दती आणि निवड तंत्र.

प्रकरण चौथे- संकलीत माहितीचे सारणीय व अर्थ निर्वेचन.

प्रकरण पाचवे- निष्कर्ष, शिफारशी व उपाय योजना

संदर्भ ग्रंथ सूची :

1. नाशिक जिल्हयातील शहरी महिलांच्या आर्थिक व सामाजिक सबलीकरणाचे अध्ययण विशेष संदर्भ मालेगांव व नाशिक शहरातील स्वयंसहाय्यता गटाच्या माध्यमातुन होणाऱ्या महिला सबलीकरणाचे तुलनात्मक अध्ययन- श्री सोनवणे ज्ञानेश्वर नामदेव.
2. महिला व बालविकासाच्या योजना- महाराष्ट्र शासन
3. महिला सबलीकरण - डॉ. सुवर्णा सुर्यवंशी
4. भारतातील महिला सक्षमीकरणा समस्या, आव्हाने आणि भविष्यातील दिशा- सौमित्र चक्रवर्ती
5. महिला सबलीकरण- प्रा. डॉ. संभाजी एन. देसाई, प्रशांत पब्लीकेशन
6. चौगुले सुमती महिला सबलीकरणाची नवी दिशा इंदुजा प्रकाशन २००५
7. डॉ. संदीप कुमार चौधरी

   शिक्षण आणि समाज योजना एप्रिल २००६

   महिला सशक्तिकरण शिक्षणाची भूमिका

   शिक्षण आणि समाज योजना एप्रिल २००४
8. डॉ. भगवान सहाय्य मंत्रालय विभागांमधील महत्वाच्या विविध शासकीय योजनांची माहिती पुस्तिका सामान्य प्रशासन विभाग, मुंबई दि. १४ सप्टेंबर २०१५.
9. वसुंधरा स्मरणिका

   भारतातील महिलांची आर्थिक स्थिती

के. आर. एम. कला व वाणिज्य महाविद्यालय, नांदेड

दि. १३ मार्च २०१०

10. आढाव विकास (२०१०), महिला सबलीकरण प्रौढ निरंतर शिक्षण व ज्ञान विस्तार विभाग पुणे विद्यापीठ, पुणे.
11. देवतुत, महिला सबलीकरण आणि कायदे, दि. ११ ऑक्टोबर २०१८ स्त्री सबलीकरणात विविध योजनांचे योगदान एक ऐतिहासिक आढावा - प्रा. सौ. संगीता स. स्वामी.
12. स्वयं मदत गटामध्ये सहभाग आणि महिलांचे सक्षमीकरण- एक अभ्यास- अभ्याकुमार नयक प्रविण कुमार पाणिगृही
13. महिला सक्षमीकरण दृष्टिकोन आणि दृश्य डॉ. तनु टंडन
14. डॉ. प्रदिप दिवसे महिला व बालविकास Saimakatta प्रकाशन, पुणे सन २०१८-२०१९.

संशोधिका	मार्गदर्शक
कु. सरिता बाबुराव कदम	प्रा. डॉ. वसंत आनंदराव पवळे
(पीएच.डी. प्रशिक्षणार्थी)	(एमकॉम, पीएच.डी. एल. एल. एम)